# मुंबई विद्यापीठ

पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग,
छत्रपती शिवाजी महाराज भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पुर्व),
मुंबई - ४०० ०९८.

क्र. परीक्षा / पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/ 443 /२०२४

परिपत्रक :-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक आपणा सर्वांना कळविण्यात येते की, द्वितीय सत्र २०२३ मध्ये विद्यापीठाने घेतलेल्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठीचे पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रतीसाठींचे अर्ज व यासाठीचे विहित शुल्क Online पद्धतीने विद्यापीठाच्या www.mu.ac.in या अधिकृत संकेत स्थळावरून घेण्यात येणार आहेत.

**Path for Online Application:-**

**www.mu.ac.in → Examination → Application for Revaluation / Photocopy**

उपरोक्त लिंक संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर पुढील सात दिवसाच्या आत सुरू करण्यात येईल व लिंक सुरू झाल्यापासून पुढील बारा दिवसांपर्यंत ही लिंक सुरू राहिल, तरी या कालावधीत वरील प्रमाणे कार्यवाही करावी.

अर्ज स्वीकारण्याची वरील मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

- अर्ज भरताना शुल्क भरणा तसेच अन्य कोणत्याही अडचणी आल्यास, आपण आपल्या परीक्षेच्या लिंक बंद होण्याच्या दिनांकापुर्वी कृपया खालील दिलेल्या पत्त्यावर स. ११.०० ते दु. ३.०० या कालावधीत संपर्क साधावा.
- पत्ता :- उपकुलसचिव, पुनर्मुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, छत्रपती शिवाजी महाराज भवन, पहिला मजला, कलिना, सांताक्रुझ (पु), मुंबई - ४०० ०९८. किंवा - revalphotosh23@gmail.com या Email ID वर मेल करावा.

तसेच विद्यापीठाच्यावतीने महाविद्यालयांनी घेतलेल्या T.Y.B.Sc. (Sem-V & VI) (Choice Based), T.Y.B.Com. (Sem-V & VI) (Choice Based) या अभ्यासक्रमाच्या Applied Componants विषयांचे पुनर्मुल्यांकन महाविद्यालय स्तरावर करून पुनर्मूल्यांकनात प्राप्त गुणांची यादी सॉफ्ट कॉपी (पेन ड्राइव) व हार्ड कॉपी स्वरूपात संबंधित परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यापासून पुढील ३० दिवसांच्या आत पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, छत्रपती शिवाजी महाराज भवन, पहिला मजला, येथे स. ११.०० ते दु. ३.०० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.

वरील प्रमाणेच्या गुणांच्या यादया नमुद केलेल्या कालावधी नंतर कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाही व याबाबत भविष्यात काही प्रशासकीय/तांत्रिक /न्यायालयीन बाब्री उद्भवल्यास यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहिल.

शुल्काचा तपशील:-

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who get concession in tution fees and other fees) |
|---|---|---|
| अर्ज शुल्क :- | रू. १०/- | रू. १०/- |
| पुर्नमुल्यांकन शुल्क :- | रू. २५०/- | रू. १२५/- |
| छायांकित प्रत शुल्क :- | रू. ५०/- | रू. २५/- |



Scanned with CamScanner

तरी उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घेऊन सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(डॉ. प्रसाद कारंडे)
प्रभारी संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

स्थळ : मुंबई
दिनांक : ०९ जानेवारी, २०२४

अ. प्रत:-

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित/स्वायत्त महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे सं चालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक व विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण परिक्षेत्राचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:-

१. केंद्रीय संगणक सुविधा विभागातील सर्व अधिकारी वर्ग
२. सर्व उपकुलसचिव, मुंबई विद्यापीठ
३. सर्व सहायक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:-

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व वित्त व लेखा अधिकारी यांचे स्विय सहायक



Scanned with CamScanner